सामना उत्सव
रविवार पुरवणी
गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा

# सद्गुरू तीर्थ

## जो शिष्याला ज्ञानाचा प्रकाश, भक्तीचे बळ आणि कर्माचे कौशल्य देऊन भवसागराचा पैलतीर गाठायला मदत करतो, तो म्हणजे सद्गुरू.

मनुष्याचे संपूर्ण आयुष्यात एकदा तरी पवित्र अशा तीर्थस्थानांचे दर्शन घ्यावे जेणेकरून अनेक जन्मात समुच्चय झालेल्या पापांचा विनाश होऊन त्याला सद्गती प्राप्त होते, अशी श्रद्धा केवळ हिंदू धर्मात नव्हे तर इतरही धर्मात आहे. जे पाप-पुण्याच्या चक्रातून मनुष्याला तारून नेते ते तीर्थ! प्रचीन हिंदू वाङ्मयात अनेक प्रकारची तीर्थे सांगितली आहेत. त्यात सृष्टीत नैसर्गिकपणे आढळणारी काही स्थानं, उदा. गंगा, यमुना, नर्मदेसारख्या सप्त नद्यांच्या काठावरचा परिसर, किंवा काही विशिष्ट काळात प्रकट होणारी राजापूरच्या गंगेसारखी ठिकाणं आहेत, तसेच ईश्वरीय अवतारांनी जिथे जिथे वास्तव्य केले अशी भगवदीय तीर्थ उदा. तपोवन, वृंदावन इ. सुद्धा आहेत. पुराणांमध्ये अजून एका तीर्थप्रकाराचा उल्लेख आहे, ते म्हणजे संततीर्थ. ज्या जीवनमुक्त सत्पुरुषांनी देहातीत आणि परममुक्त असं जीवन व्यतीत केलेलं असतं, अशा स्वत:च तीर्थस्वरूप असलेल्या संताच्या वास्तव्यामुळे पवित्र झालेल्या क्षेत्रांना संततीर्थ म्हणतात. महाराष्ट्रात अशा संततीर्थांची मांदियाळी आहे!

या तीर्थ क्षेत्रांना भेट देण्याचा मुख्य उद्देश म्हणजे शक्तीग्रहण! अनेक सत्पुषांनी वर्षानुवर्षं परमोच्च हेतूने या स्थळांवर साधना केल्यामुळे तिथल्या माती, पाणी इत्यादी जड वस्तूंवरसुद्धा याचे संस्करण झालेले असते, जे साधकांना ग्रहण करता येऊन त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीला मदत होते. परंतु या तीर्थस्थानांना देश-कालाची बंधने असतात. देशकालातीत असणाऱ्या आणि मानवी देहात अवतीर्ण होणाऱ्या अजून एका तीर्थाचा उल्लेख पुराणात आळळतो, ते म्हणजे सद्गुरूतीर्थ. अर्थात, सदेह सद्गुरूंच्या माध्यमातून अवतरीत होणारे प्रत्यक्ष सद्गुरूतत्त्व! अग्नितत्त्व हे सर्वव्यापक असले तरी ते केवळ एखादा दिवा, कंदिल, निरांजन इत्यादींद्वारे प्रत्यक्ष अग्नी प्रज्वलित केला तरच दृष्टीगोचर होते. विद्युतशक्तीचे वहनसुद्धा विद्युत तारेतून होत असते, परंतु प्रकटीकरण मात्र तारेतून न होता बल्ब, पंखा किंवा तत्सदृश उपकरणांद्वारे होत असते. म्हणजेच जिथे जिथे त्या शक्तीच्या प्रकटीकरणाची योजना झालेली असते तिथे तिथे तिचे प्रकटीकरण होत असते. त्याचप्रमाणे, लाकूड हे विद्युत शक्तीसाठी मंदवाहक असले तरी अग्नीच्या शक्तीचे स्फुरण ते ग्रहण करू शकते, म्हणूनच लाकडामध्ये अग्नी प्रकट होतो, परंतु पाषाणात होत नाही. त्याचे कारण म्हणजे पाषाणाला अग्नीची शक्ती तेवढ्या प्रकर्षाने ग्रहण करता येत नाही. लाकडामध्ये असा अग्नी प्रकट झाल्यावर मात्र लाकूड हे लाकूड राहत नाही, तर त्याचा अग्नीच होतो. म्हणजेच अग्नी आणि लाकूड हे एकच झालेले असतात. त्याचप्रमाणे श्रीमन् नृसिंह सरस्वती स्वामीमहाराजांसारख्या दत्तावतारी वेरण्य यतिंमध्ये प्रत्यक्ष ईश्वरीतत्त्व त्याच्या पूर्ण शक्तींसह प्रकट झालेले असते व त्याच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांना ज्ञानाचा प्रकाश देत राहते. ज्या पद्धतीने हे प्रकटीकरण त्यांच्या देहात झालेले असते त्याच पद्धतीने हे प्रकटीकरण संपर्कात येणाऱ्या प्रत्येकात कसे होईल, याचा विचार करणारे गुरूतत्त्वच तेथे कार्यरत असते, म्हणूनच अशा सत्पुरुषांना आपल्या संस्कृतीने महत्त्वाचे व आदराचे असे गुरूपदावरील स्थान दिलेले आहे. दत्तसंप्रदायाला आदरस्थानी असलेले प.पू. श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज म्हणूनच सद्गुरूंना तीर्थांमधील परमतीर्थ म्हणतात.

तीर्थानां परमं तीर्थं तारकाणां च तारकम्!
सद्गुर्वाख्यं महातीर्थं भजामि परमार्थदम् ।।७।।
(सद्गुरूतीर्थस्तोत्रम्)

संपूर्ण विश्वात भरून राहिलेली शक्ती म्हणजे ब्रह्मतत्त्व, ज्याला आत्मतत्त्व, ईश्वरीतत्त्व किंवा सद्गुरूतत्त्व या विविध नावांनी ओळखले जाते. श्रीमद्भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे काहीही केले तरी या तत्त्वाचा नाश होऊ शकत नाही आणि त्यात परिवर्तनही होत नाही. बदल होतात ते त्रिगुणात्मक अशा विकारवश सृष्टीत. म्हणून नित्य बदल होणाऱ्या अशाश्वत सृष्टीला अद्वैत वेदांतात 'मिथ्या' म्हणतात आणि मिथ्यत्वाच्या भासाला सत्य समजून, खऱ्या सत्याचा विसर पडणे म्हणजे अज्ञान! मुळात निर्गुण निराकार असलेल्या आणि प्रत्येक जीवांत उपस्थित असणाऱ्या ब्रह्मतत्त्वाचे यथार्थ ज्ञान करून घेण्यासाठी मात्र अश्वाश्वत, परंतु दृश्य असणाऱ्या सगुणाचीच मदत घेणे इष्ट आहे. याचा उद्घोष हिंदुस्थानी अध्यात्मात वारंवार केला गेला आहे. किंबहुना याच सिद्धांताच्या आधारावर प्रतीकोपासनेचा उदय झाला. जेव्हा एखाद्या मूर्तीला विशिष्ट देवतेचं प्रतीक मानून अत्यंत श्रद्धेने तिची भक्ती आपण करतो तेव्हा आपल्याच श्रद्धेमुळे त्या पाषाणातही चैतन्य निर्माण होते. मग हीच एकाग्रता जर 'मन' नामक चैतन्य शक्तीचे सामर्थ्य लाभलेल्या सदेह सद्गुरूंवर केली तर आपल्या श्रद्धेच्या प्रमाणात तीच शक्ती स्वशक्तीपुनर्मेळाच्या सिद्धांतानुसार गुणाकाराने आपल्यालाच परत मिळते, ज्यामुळे आपली आध्यात्मिक प्रगती साध्य होते. भौतिक जगाप्रमाणे अध्यात्मातही प्रगतीसाठी गती आणि गतीसाठी शक्तीची आवश्यकता असते! असा जीवनमुक्त, देहातीत, विश्वाच्या संसारात असूनही त्याच्यात लिप्त नसलेला मानव, जो शिष्याला ज्ञानाचा प्रकाश, भक्तीचे बळ आणि कर्माचे कौशल्य देऊन भवसागराचा पैलतीर गाठायला मदत करतो, तो म्हणजे सद्गुरू.

सद्गुरूतत्त्वाचा महिमा आणि सदेह सद्गुरूंच्या महतीचे वर्णन गुरुचरित्र, दासबोध, ज्ञानेश्वरीसारख्या आध्यात्मिक महाग्रंथातून उच्चरवाने सांगण्यात आले आहे. संत श्रेष्ठ नामदेवांच्या सद्गुरूवाचून कच्च्या राहिलेल्या मडक्याच्या कथेसारख्या अनेक कथाही जनमानसात प्रसिद्ध आहेत. विज्ञानाच्या समगती स्पदंन (ेिदर्हम) शक्तीपुनर्मेळ (ग्दीम्ि) यासारख्या सिद्धांतांच्या आधारेसुद्धा हे समजून घेता येतं. या सर्व सिद्धांतांचे अवलोकन करून चिंतन, मननाच्या आधारावर स्वानुभूतीच्या तळमळीच्या इच्छेसह जो शिष्य सद्गुरूंना शरण जाण्याचा कृतीसह निश्चय करतो तोच या सद्गुरूतीर्थाच्या ज्ञानगंगेत अखंड स्नान करण्यासाठी पात्र ठरतो आणि अशा सत् शिष्याला कोऽहं पासून सोऽहं पर्यंतचा प्रवास घडण्यास श्रीगुरू समर्थ असतात!

।।तस्मै श्रीगुरवे नम:।।

(बापट गुरुजी ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर आणि खोपोली स्थानांवर गुरूपदी विराजमान आहेत. संपर्क bhende@indiatimes.com.
- बापट गुरुजी

After 3rd Quarter Results
Ads by Guruji



Ads by Guruji

PRE-BUDGET RALLY

